पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९७२ /२०१४
दिनांक : ०५/१२/२०१४

प्रति,
मा......................................
सदस्य, महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा दिनांक १०/१२/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१०/१२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ९**

दिनांक : १०/१२/२०१४ वेळ : दुपारी - ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१०/१२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ८)** चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत मोफत शिवणयंत्र वाटप या योजनेअंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये सन २००९-१० व २०१०-११ मधील जुनी पोहोच पावती असणा-या अर्जदारांकडून शिवणयंत्र मिळणेकामी जाहीर प्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता ९० इतके अर्ज प्राप्त झाले. प्राप्त अर्जांपैकी ४८ पात्र लाभार्थिंना सन २००९ मधील जुन्या शिवणयंत्राचे वाटप करण्यात आले. तसन सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता २४५५ इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. सन २०१०-११ मधील शिवणयंत्र मिळणेकामी अर्ज केलेल्या ३४५ अपात्र झालेल्या अर्जदारांनी पुन्हा त्रूटी पुर्तता करुन दिली आहे. असे एकूण सन २०१०-११ मधील २८०० एवढे अर्ज विभागात प्राप्त झालेले आहेत. या अर्जांपैकी १४०० अर्जांची छाननी केली असता १२०० अर्ज पात्र ठरले आहेत. म्हणजेच ८० टक्के इतके अर्ज पात्र ठरले असून २० टक्के इतके अर्ज अपात्र ठरले आहेत. म्हणजेच २८०० अर्जांपैकी २२४० अर्ज पात्र ठरतील असा अंदाज आहे. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता १४७३४ अर्ज प्राप्त झाले असून या अर्जाची तपासणी प्रक्रिया चालू असून या अर्जांपैकी १२०० अर्जांची तपासणी केली आहे. त्यामध्ये ९०० अर्ज पात्र ठरले आहेत. म्हणजेच ७५ टक्के अर्ज पात्र होण्याची शक्यता आहे. म्हणजेच १४७३४ अर्जांपैकी अंदाजे एकूण ११०५० अर्ज पात्र होतील असे मत आहे. म्हणजेच दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान एकूण १३२९० शिवणयंत्रे खरेदी करावी लागणार असून अंदाजे किमान १३२९० शिवणयंत्रांच्या खरेदीची मागणी करणे उचित वाटते. या शिवणयंत्रांच्या खरेदीकामी गतवर्षीच्या किंमतीमध्ये झालेली वाढ व एल.बी.टी.कर इ. विचारात घेता एकूण मागील

खरेदी किंमतीमध्ये अंदाजे २५ टक्के दरवाढ विचारात घेता अंदाजे रक्कम रुपये ६७००/- प्रती नग या दराने शिवणमशीन खरेदी कराव्या लागतील त्यानुसार एकूण र.रु.८,९०,४३,०००/- (अक्षरी र.रु.आठ कोटी नव्वद लाख त्रेचाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. या योजनेसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात अंदाजपत्रकामध्ये र.रु.१,२५,००,०००/- एवढी तरतूद वर्ग करण्यात आली होती. त्यामधून शिवणयंत्र खरेदीच्या बिलापोटी र.रु.९५,१०,०००/- एवढे खर्ची पडले आहेत, आणि २९,९०,०००/- एवढी रक्कम शिल्लक आहे. सदर शिवणयंत्र खरेदीचा विचार करता सन २०१४-१५ सुधारित अंदाजपत्रकात ४,६५,९०,०००/- एवढी तरतूद करण्यात येणार आहे. उर्वरित शिवणयंत्रांसाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद करण्यात येणार असल्याने सदरच्या शिवणयंत्रांची खरेदी करण्यात मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९७२/२०१४
दिनांक : ०५/१२/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.